# ::"दादासाहेब फाळके चित्रपट युनियन"::

## :: घटना व नियमावली ::

**संघाचे नाव :-" दादासाहेब फाळके चित्रपट युनियन"** हे राहील आणि खालील दिलेल्या नियमामध्ये त्याचा संघ असा निर्देश केला जाईल. तसेच संघाचा पत्ता:- व्दारा- श्री. अजित बळीराम म्हामुणकर, शॉप नं. १५, सुंदराबाई चाळ, स्मशान टेकडी, प्रताप नगर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६० असा राहील.

### -- उद्दिष्टे --

**संघाची उद्दिष्टे खाली दिल्याप्रमाणे राहतील.**

१ संपूर्ण भारतातील विविध राज्ये, केंद्रशासित प्रदेश व विशेषतः मुंबई शहर, उपनगर, ठाणे व पालघर जिल्हा तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमध्ये फिल्म, टेलिव्हिजन, इंटरनेट, करमणूक व जाहिरात उद्योगातील विविध विभागांमध्ये काम करणारे निर्माता, सह निर्माता, दिग्दर्शक, सह दिग्दर्शक, आर्ट डायरेक्टर, कलाकार, स्त्री कलाकार, सह कलाकार, ज्युनियर आर्टिस्ट, लेखक, बॅक स्टेज कलाकार, कोरिओग्राफर, डान्सर, कॅमेरामन, कॅमेरा अटेन्डन्ट, लाईटमन, साऊंड रेकॉर्डीस्ट, व्हिडीओ रेकॉर्डिस्ट, स्टील फोटोग्राफर, म्युझिक कंपोजर, तंत्रज्ञ, बाऊन्सर, हेअर ड्रेस सप्लायर, हेअर ड्रेसर्स, हेल्पर, स्पॉट बॉय, कारपेंटर, फॅब्रिकेटर, मेकअप आर्टिस्ट सप्लायर, मेकअपमन, कॉस्ट्युम डिझायनर, सेट डिझायनर, सेटींग करणारे कामगार, सर्व असिस्टंट, ऑफिस असिस्टंट, सुरक्षा रक्षक व फिल्म उद्योगाशी संबंधित विविध विभागांमध्ये काम करणारे वेतन देणारे व वेतन घेणारे कामगार/कर्मचारी यांना एकत्रित आणणे आणि त्यांचे निर्मात्यांशी, दिग्दर्शकांशी, मालकांशी, व्यावसायीकांशी तसेच व्यवस्थापनांशी असलेले संबंध नियमित करणे. त्यांची एकजुट करणे. त्यांचे न्याय हक्क मिळणेसाठी प्रयत्न करणे व त्यांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देणे.

२ सदस्यांना त्यांच्या जीवनमानात आणि सेवेत सुस्थिती प्राप्त करुन देणे.

३ त्यांची गा-हाणी दूर करण्याचा प्रयत्न करणे.

४ रुग्णता, बेकारी, विफलता, विकलांगता वार्धक्यआणि मृत्यु याबाबत तरतूद करुन देण्याचा प्रयत्न करणे.

५ कामगार नुकसान भरपाई अधिनियमानुसार सदस्यांना अपघाताच्या प्रकरणाबाबत नुकसान भरपाई मिळवून देण्याचा प्रयत्न करणे. तसेच निर्मात्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांना आवश्यक ती मदत करणे. त्यांचे डिस्ट्रीब्युटर, ॲडर्व्हटायझर अथवा अन्य व्यक्तींकडून/संस्थांकडून येणे असलेली रक्कम मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

कलाकार व तंत्रज्ञ यांच्या मानधन कपातीला तसेच कामगार/कर्मचारी यांच्या वेतन कपातीला अथवा कामगार/कर्मचारी यांच्या ठरलेल्या रकमेतील कपातीला तसेच निर्मात्यांच्या डिस्ट्रीब्युटर, ॲडर्व्हटायझर

उप निबंधक, श्रमिक संघ, महाराष्ट्र शासन, मुंबई

No any Stamp

Scanned with CamScanner

अथवा अन्य व्यक्तींकडून/संस्थांकडून येणेअसलेल्या रकमेतील कपातीला विरोध करणेआणि परिस्थिती नुसार शक्य झाल्यास आगावू रक्कम मिळवून देण्याचा प्रयत्न करणे. काहीवेळा निर्मात्यांनी त्यांचा चित्रपट, मालिका, डिस्ट्रीब्युटरला वितरणासाठी सोपविल्यावर त्याचे पैसे वेळेवर निर्मात्याला डिस्ट्रीब्युटर कडून परत मिळत नाहीत. अशा प्रसंगी संघटनेकडून डिस्ट्रीब्युटरवर दबाव आणून निर्मात्याचे सर्व पैसे वेळेवर मिळवून देणेसाठी प्रयत्न करणे.

कामातील खंड टाळता यावा म्हणून कामगार, मालक आणि निर्माते यांच्यातील तंटयात सचोटीने तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करणे. तसेच प्रत्येक कलाकाराला महिन्यातून किमान १२ ते १५ दिवस काम मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

८ निर्माते-कलाकार, सहकलाकार, तंत्रज्ञ, कामगार/कर्मचारी यांना शुटिंगसाठी बाहेरगावी घेऊन जातात. मात्र तेथे कलाकार, सहकलाकार तंत्रज्ञ यांना आवश्यक त्या सोई, सुविधा पुरविल्या जात नाहीत. तसेच शुटींगच्या ठिकाणी सुरक्षा विषयक आवश्यक त्या सोई उपलब्ध केल्या जात नाहीत. त्यामुळे एखादा अपघात झाल्यास कलाकारांना प्रथमोपचार सुध्दा मिळत नाहीत. अशा ठिकाणी शुटिंग न ठेवण्याचे व शुटिंग ठेवल्यास सर्व सोई सुविधा उपलब्ध्द करुन देण्यासाठी निर्मात्यांकडे आग्रह धरणे.

९ मुंबई बाहेरच्या भारतातील शुटिंगसाठी २ पट मानधन व दुप्पट वाढीव भत्ता तसेच परदेशातील शुटींगसाठी ४ पट वाढीव मानधन व ४ पट वाढीव भत्ता तसेच बाहेरगावी नेण्याचा, आणण्याचा, रहाण्याचा तसेच परदेशात जाण्याचा, येण्याचा व रहाण्याचा संपुर्ण खर्च निर्मात्याने करणेसाठी भाग पाडणे. तसेच सलग ८ तासांपेक्षा जास्तवेळ शुटींग केल्यास जादा वेळेचे मानधान सर्वांना दुप्पट दराने निर्मात्याकडून मिळवून देणे.

१० शुटिंगसाठी बाहेरगावी गेलेल्या कलाकार,सहकलाकार, तंत्रज्ञ, कामगार/कर्मचारी यांची उपस्थिती संघटनेच्या मुख्य कार्यालयात नोंदविण्यात येईल व त्यानुसार त्यांना मानधन, पगार व भत्ते निर्मात्याने १५ दिवसांचे आंत अदा करण्याबाबत निर्मात्यांकडे आग्रह धरण्यात यईल.

११ काही वेळा चित्रीकरणासाठी निर्मात्याने भाडयाने घेतलेल्या स्टयुडिओमध्ये काही संघटनांकडून सह कलाकार, तंत्रज्ञ, कामगार, मदतनीस पुरविण्यास विरोध केला जातो. त्यामुळे निर्मात्याचे बरेच नुकसान होते. कलाकारांनी अन्य निर्मात्यांना दिलेल्या तारखांना उपस्थित रहाणे मुश्किल होते. पर्यायाने सर्वांच्याच कामकाजावर परिणाम होतो व सर्वांचेच नुकसान होते. अशा अपप्रवृत्तीच्या संघटनांना कडाडून विरोध करणे व निर्मात्यांना त्यांचे चित्रिकरण पुर्ण करण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे.

१२ कलाकार, सह कलाकार, तंत्रज्ञ, कामगार, मदतनीस व अन्य यांच्या कामाचा संपुर्ण मोबदला, मेहनताना तात्काळ त्यांचे बँक खात्यात परस्पर जमा करण्याबाबत निर्मात्यांवर दबाव आणणे. जेणेकरुन त्यात कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची कपात केली जाणार नाही.

Scanned with CamScanner

१३ काहीवेळा चित्रिकरणाच्या वेळी अपघात होतात व त्यामध्ये कलाकार, तंत्रज्ञ, कामगार, मदतनीस यांना दुखापत होते. अशा प्रसंगी तात्काळ वैद्यकीय मदत मिळणेसाठी चित्रीकरणाचे ठिकाणी वैद्यकीय पथक तैनात करणे, रुग्णवाहीका तैनात ठेवणे तसेच काही असामाजिक व्यक्तींकडून कलाकार वअन्य यांना त्रास दिला जातो . त्यासाठी पुरेशा सुरक्षा रक्षकांची तैनाती चित्रीकरणाचे ठिकाणी तसेच कलाकार व अन्य यांचे वास्तव्याचे ठिकाणी निर्मात्यानी करण्याबाबत संघटनेकडून आग्रह धरणे व तशी व्यवस्था करुन घेणे. अपघातग्रस्त कलाकार व अन्य यांची प्रकृती पुर्ण बरी होई पर्यंतचा सर्व खर्च निर्मात्यांकडून करणेसाठी प्रयत्न करणे. तसेच एखाद्या संस्ट करताना स्टंट कलाकाराचा, तंत्रज्ञाचा अथवा कलाकार, सह कलाकाराचा, कामगाराचा मृत्यु झाल्यास अथवा त्यास हॉस्पीटलमध्ये दाखल केल्यास त्याचा सर्व खर्च निर्मात्याने करण्याबाबत आग्रह धरणे. तसेच निर्मात्याकडून रु. ५,००,०००/- ते रु. ११,००,०००/- पर्यंत नुकसान भरपाई म्हणून रक्कम मिळवून देणे. जर तो जायबंदी झाला असल्यास त्याच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्यासाठी दानशुर व्यक्तींकडून देणगी स्वीकारुन ती संघटनेच्या फंडामध्ये जमा करुन अशा व्यक्तीस अथवा त्याचे नातेवाईकांस कायम स्वरुपी मदत करणे.

१४ सर्व कलाकार, तंत्रज्ञ, सहाय्यक, कामगार/कर्मचारी यांना त्यांचे उतारवयात फारच जिकीरीचे जीवन जगावे लागते. यासाठी संघटनेमार्फत फंड निर्माण करुन त्यांना कायम स्वरुपी मदत देण्याचा प्रयत्न करणे तसेच संघटनेच्या सर्व सभासदांचा आर्युविमा व वैद्यकिय विमा उतरविणे, जेणेकरुन त्यांचे आजारपणात त्यांना पैसे खर्च करण्याचा प्रश्न उद्भवणार नाही.

१५ एखादया कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या वारसास मृत कामगाराचे जागेवर नोकरी/काम मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

१६ संघाच्या मंजूरीने पुकारलेल्या संपाच्या काळात, टाळेबंदीच्या काळात किंवा बंदच्या काळात सदस्यांना मदत देण्याचा प्रयत्न करणे.

१७ संपुर्ण भारतातील विविध राज्ये, केंद्रशासित प्रदेश व विशेषतः मुंबई शहर, उपनगर, ठाणे व पालघर जिल्हा तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमध्ये फिल्म, टेलिव्हिजन, इंटरनेट, करमणूक व जाहिरात उद्योगातील विविध विभागांमध्ये काम करणारे निर्माता, सह निर्माता, दिग्दर्शक, सह दिग्दर्शक, आर्ट डायरेक्टर, कलाकार, स्त्री कलाकार, सह कलाकार, ज्युनियर आर्टिस्ट, लेखक, बॅक स्टेज कलाकार, कोरिओग्राफर, डान्सर, कॅमेरामन, कॅमेरा अटेन्डन्ट, लाईटमन, साऊंड रेकॉर्डीस्ट, व्हिडीओ रेकॉर्डिस्ट, स्टील फोटोग्राफर, म्युझिक कंपोजर, तंत्रज्ञ, बाऊन्सर, हेअर ड्रेस सप्लायर, हेअर ड्रेसर्स, हेल्पर, स्पॉट बॉय, कारपेंटर, फॅब्रिकेटर, मेकअप आर्टिस्ट सप्लायर, मेकअपमन, कॉस्च्युम डिझायनर, सेट डिझायनर, सेटींग करणारे कामगार, सर्व असिस्टंट, ऑफिस असिस्टंट, सुरक्षा रक्षक व फिल्म उद्योगाशी संबंधित विविध विभागांमध्ये काम करणारे वेतन देणारे व वेतन घेणारे कामगार/कर्मचारी तसेच या

उप निबंधक, श्रमिक संघ, महाराष्ट्र श्रमिक संघ अधिनियम, १९२६, महाराष्ट्र शासन, मुंबई

प्रमाणे अन्यत्र कार्यरत असलेले सर्व कलाकार, तंत्रज्ञ, कामगार/कर्मचारी यांची माहिती मिळविणे.

१८ संपुर्ण भारतातील विविध राज्ये,केंद्रशासित प्रदेश, विशेषतः मुंबई शहर, उपनगर, ठाणे व पालघर जिल्हा तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमध्ये फिल्म, टेलिव्हिजन, इंटरनेट, करमणूक व जाहिरात उद्योगातील विविध विभागांमध्ये काम करणारे निर्माता, सह निर्माता, दिग्दर्शक, सह दिग्दर्शक, आर्ट डायरेक्टर, कलाकार, स्त्री कलाकार, सह कलाकार, ज्युनियर आर्टिस्ट, लेखक, बॅक स्टेज कलाकार, कोरिओग्राफर, डान्सर, कॅमेरामन, कॅमेरा अटेन्डन्ट, लाईटमन, साऊंड रेकॉर्डीस्ट, व्हिडीओ रेकॉर्डिस्ट, स्टील फोटोग्राफर, म्युझिक कंपोजर, तंत्रज्ञ, बाऊन्सर, हेअर ड्रेस सप्लायर, हेअर ड्रेसर्स, हेल्पर, स्पॉट बॉय, कारपेंटर, फॅब्रिकेटर, मेकअप आर्टिस्ट सप्लायर, मेकअपमन, कॉस्ट्युम डिझायनर, सेट डिझायनर, सेटींग करणारे कामगार, सर्व असिस्टंट, ऑफिस असिस्टंट, सुरक्षा रक्षक व फिल्म उद्योगाशी संबंधित विविध विभागांमध्ये काम करणारे वेतन देणारे व वेतन घेणारे कामगार/कर्मचारी यांच्या संघटने सारख्या अन्यत्र कार्यरत असलेल्या संघटनांना विशेषतः सारखीच उद्दिष्टेअसलेल्या संघटनांना सहकार्य देणे.

१९ हया संघटनांशी विचार विनिमय करुन संघटनेच्या सभासदांना मालकवर्ग तसेच निर्मात्यांकडून जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.

२० संघटनेच्या सभासदांना, कलाकारांना,निर्मात्यांना शासकीय,निमशासकीय योजनांचे जास्तीत जास्त लाभ मिळवून देणे, तसेच त्यांचा सामाजिक, आर्थिक व राजकिय दर्जा व त्यांचे जीवनमान, राहणीमान सुधारण्यासाठी प्रसंगी शासकीय, निमशासकीय कार्यालयांशी संपर्क साधणे व सभासदांना तसेच निर्मात्यांना शासकीय योजनांचा फायदा मिळवून देणेसाठी मदत करणे.

२१ हया नियमात उल्लेखिलेल्या उदिदष्टांच्या प्रचलनासाठी श्रमिक संघाच्या अधिनियमानुसार मुंबई व उपनगर जिल्हयातील तसेच महाराष्ट्र आणि महाराष्ट्रा बाहेरील व संपुर्ण भारतातील संघटनांना तसेच विदेशातील संघटनांना मदत करणे.

२२ निर्माते, दिग्दर्शक, वितरक, अॅडर्व्हटायझर, कलाकार, तंत्रज्ञ, कामगार/कर्मचारी व संघटना यांचेमध्ये काही विवाद निर्माण झाल्यास सर्वजण एकत्र बसून विवाद संपुष्टात आणतील.

२३ साथीचे रोग व अन्य कारणांमुळे कलाकारांचे, कामगार वर्गाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच कलाकारांचे व अन्य कामगारांचे झालेले नुकसान भरपाईसाठी शासनाकडे पाठपुरावा करणे. तसेच दानशूर व्यक्तिंकडून देणगीव्दारे मदत मिळवून एक स्वतंत्र फंड निर्माण करुन शक्य होईल ती मदत संघटने मार्फत सदस्यांना देण्याचा प्रयत्न करणे.

२४ संघटनेमार्फत राष्ट्रीय नेत्यांच्या जयंत्या, महत्वाचे सण, उत्सव, १५ ऑगष्ट, २६ जानेवारी, १ मे कामगार दिन इत्यादी साजरे करणे. संघटनेच्या सदस्यांचे ज्ञानात वृध्दी होणेसाठी तसेच त्यांचे आरोग्य चांगले

राहणेसाठी व त्यांची कार्यक्षमता वाढीसाठी विविध नेत्यांची व्याख्याने, परिषदा, चर्चासत्रे, आरोग्य विषयक शिबिरे आयोजित करणे. सदस्यांना योग्य ते प्रशिक्षण देणे.

२५ साधारणपणे सदस्यांची सामाजिक,आर्थिक,नागरीक आणि राजकीय स्थिती सुधारण्याकरिता आवश्यक असे इतर उपाय योजना करणे.

[redacted] २६ ही उदिदष्टे साध्य करण्यासाठी मुंबई व उपनगर जिल्हा तसेच महाराष्ट्र आणि महाराष्ट्रा बाहेरील संपुर्ण भारतातील विविध राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशामध्ये संघाला केंद्र संघटीत करता येईल. संघटनेचे कार्यक्षेत्र संपुर्ण भारतभर राहील.

**-: सर्वसाधारण सदस्यांना प्रवेश :-**

३ वयाची १८ वर्षे पूर्ण झाली असलेल्या संपुर्ण भारतातील विविध राज्ये, केंद्रशासित प्रदेश व विशेषतः मुंबई शहर, उपनगर, ठाणे व पालघर जिल्हा तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्हयांमध्ये फिल्म, टेलिव्हिजन, इंटरनेट, करमणूक व जाहिरात उद्योगातील विविध विभागांमध्ये काम करणारे निर्माता, सह निर्माता, दिग्दर्शक, सह दिग्दर्शक, आर्ट डायरेक्टर, कलाकार, स्त्री कलाकार, सह कलाकार, ज्युनियर आर्टिस्ट, लेखक, बॅक स्टेज कलाकार, कोरिओग्राफर, डान्सर, कॅमेरामन, कॅमेरा अटेन्डन्ट, लाईटमन, साऊंड रेकॉर्डीस्ट, व्हिडीओ रेकॉर्डिस्ट, स्टील फोटोग्राफर, म्युझिक कंपोजर, तंत्रज्ञ, बाऊन्सर, हेअर ड्रेस सप्लायर, हेअर ड्रेसर्स, हेल्पर, स्पॉट बॉय, कारपेंटर, फॅब्रिकेटर, मेकअप आर्टिस्ट सप्लायर, मेकअपमन, कॉस्ट्युम डिझायनर, सेट डिझायनर, सेटींग करणारे कामगार, सर्व असिस्टंट, ऑफिस असिस्टंट, सुरक्षा रक्षक व फिल्म उद्योगाशी संबंधित विविध विभागांमध्ये काम करणारे वेतन देणारे व वेतन घेणारे कामगार/कर्मचारी हे संघाकडून वेळोवेळी केल्या जाणा-या अधिनियमाचे व उपविधीचे पालन करण्यास कबूल असतील तर रुपये १,०००/-(रुपये एक हजार फक्त) प्रवेश फी आणि रुपये ४००/-(रुपये चारशे फक्त) मासिक वर्गणी म्हणजेच वार्षिक वर्गणी रु. ४,८००/- (रुपये चार हजार आठशे फक्त) भरुन संघाचा सामान्य सभासद होता येईल.

अ सदरहू वर्गणी दरवर्षी जानेवारी महिन्याच्या १५ तारखेपर्यंत संघटनेकडे जमा करण्यात यावी.

ब ज्या कलाकार,सहकलाकार,तंत्रज्ञ वअन्य यांना संघटनेकडून काम मिळवून देण्यात येईल, त्या कलाकार सहकलाकार, तंत्रज्ञ व अन्य यांनी त्यांना मिळणा-या मानधनातून २ टक्के ते ५ टक्के रक्कम संघटनेला देणगी म्हणून दयावी.

उप निबंधक, श्रमिक संघ, महाराष्ट्र श्रमिक संघ अधिनियम १९२६, महाराष्ट्र शासन, मुंबई

**-: मानसेवी सदस्यांना प्रवेश :-**

ज्या व्यक्ती संघाचे सामान्य सदस्य होण्यास पात्र नसतील त्यांना व्यवस्थापन समितीवर निवडून येता यावे किंवा स्विकृत करुन घेता यावे याकरिता संघाचे मानसेवी सदस्य म्हणून दाखल करुन घेता येईल आणि त्यांच्या पदावर ते संघाचे मानसेवी सदस्य राहतील. भविष्यात मानसेवी सदस्यांची नियुक्ती करावयाची

Scanned with CamScanner

झाल्यास त्याचे सर्व अधिकार कार्यकारणीस राहतील. श्रमिक संघ अधिनियम १९२६ च्या कलम २२ मधील उपबंधान्वये मानसेवी सदस्यांची संख्या (५) पाच पेक्षा अधिक असणार नाही.

**-: दंड आणि जप्ती :-**

[redacted] व्यवस्थापन समितीच्या परवानगीने ६ महिने पर्यंत आपली मासिक वर्गणी न भरणारा किंवा उपरोक्त समितीच्या परवानगी शिवाय ३ महिने पर्यंत वर्गणी न भरणारा सदस्य म्हणून राहणे बंद होईल. परंतु आपली थकबाकी भरल्यानंतर त्याला पुन्हा संघटनेत येण्याचा हक्क राहील.अशा सदस्याकडून दंड म्हणून रु. २,४००/-(रुपये दोन हजार चारशे फक्त) घेण्यात येतील.

**-: लाभ :-**

कोणताही सदस्य निदान सहा महिनेपर्यंत संघटनेचा सदस्य असल्या शिवाय आणि त्याने संघटनेची सर्व देणी दिलेली असल्याशिवाय त्याला, संघटनेनेआपल्या सदस्यांना दिलेले लाभ मिळण्यास तो पात्र राहणार नाही.

७ ज्यांची वर्गणी किंवा देय रकमा भरावयाच्या राहिल्याअशा संघ सदस्यांना त्यांनी सर्व बाकी रकमा भरल्या शिवाय आणि हया बाकी रकमा भरल्याच्या तारखेपासून दोन महिन्याचा कालावधी झाला असल्या शिवाय कोणताही लाभ मिळण्याचा हक्क राहणार नाही.

व्यवस्थापक समितीच्या मंजूरी शिवाय किंवा संमती शिवाय संघाचे सदस्य संपावर गेल्यास, अथवा त्यांनी संघाच्या मंजूरी शिवाय किंवा संमती शिवाय कामबंद आंदोलन केल्यास ते कोणतेही लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

**-: सदस्यांची नोंद वही :-**

९ आपल्या सर्व सदस्यांचीनावेआणि त्यांचे कामाचे ठिकाण,त्यांचे निवासस्थान इत्यादींचा तपशीलअसलेली एक नोंदवही संघाने ठेवली पाहिजे.

१० ही नोंदवही संघाच्या मुख्य कार्यालयात सुटटयांचे दिवस सोडून इतर कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळे मध्ये कोणत्याही सदस्यांच्या किंवा अधिका-यांच्या तपासणीसाठी खुली ठेवण्यात येईल.

**-: पदधारी :-**

११ कार्यकारणी:-कार्यकारणीमध्ये एक अध्यक्ष,एक सरचिटणीस,एक खजिनदार व चार कार्यकारीणी सदस्य असे संघाचे पदाधिकारी असतील. ह्या सर्वांची निवड संघाच्या सर्वसाधारण वार्षिक सभेत दर ३ वर्षांनी होईल आणि ते फेर निवडणूकीस पात्र राहतील.

**-: संघाचे व्यवस्थापन :-**

श्रमिक संघ अधिनियम,१९२६ मधील कलम २२ च्या उपबंधास अधिन राहून व्यवस्थापन समिती, संघाची वित्त विषयक आणि इतर कार्य व सर्वसाधारण वार्षिक सभेत दर तीन वर्षांनी निवडून आलेले कार्यकारणी

Scanned with CamScanner

सदस्य यांचा समावेश असलेल्या व्यवस्थापन समितीकडून चालविले जाईल. नविन समिती नियुक्त होई पर्यंत तीच व्यवस्थापन समिती चालू राहिल.

**-: रिकामी झालेली पदे व कर्मचा-यांना कामावरुन दूर करणे :-**

१३ व्यवस्थापन समितीच्या पदाधिका-यांचे एखादे पद रिकामे झाल्यास ते व्यवस्थापन समितीकडून तात्पुरत्या स्वरुपात पुढील वार्षिक सर्वसाधारण सभा होई पर्यंत स्वीकृत करण्यात येईल. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सदरहू पदाधिका-याच्या नियुक्तीस मान्यता घेणे बंधनकारक राहिल. अशा नियुक्तीस मान्यता न मिळाल्यास त्या पदाधिका-याची नियुक्ती रद्द करण्यात येईल व नव्याने त्या पदाकरीता निवडणूक घेण्यात येईल. निवडून आलेल्या पदाधिका-याची त्या पदावरील नियुक्ती ही संघटनेच्या पुढील त्रै वार्षिक निवडणूकी पर्यंत वैध राहिल. सदरहू पदाधिका-यास पुढे संघटनेत काम करावयाचे असल्यास त्रैवार्षिक निवडणूकीमध्ये निवडून येणे बंधनकारक राहील.

१४ संघाच्या कोणत्याही पदाधिका-याला किंवा व्यवस्थापन समितीच्या एखादया सदस्याला लबाडी करण्या बद्दल किंवा संघाच्या हिताविरुध्द वर्तन करण्याबद्दल सर्वसाधारण सभेच्या ¾ सदस्यांच्या बहुमताने काढून टाकता येईल. मात्र काढून टाकावयाच्या अशा पदाधिका-याला किंवा सदस्यांना आपल्या वर्तना संबंधी खुलासा करण्याची पुरेशी संधी देण्यात आली पाहिजे. एखाद्या कर्मचारी संघटनेच्या हिता विरुध्द कार्य करीत असल्यास अथवा कामामध्ये टाळाटाळ, कामचुकारपणा, लबाडी करीत असल्यास, संघाची गुपिते बाहेरउघड करीत असल्यास,अथवा नशापान करुन कामावर येतअसल्यास किंवा कामावर गैरहजर रहात असल्यास त्याला कामावरुन कमी करण्याचा अधिकार संघटनेस राहील.

**-: व्यवस्थापन समितीच्या बैठकी :-**

१५ अध्यक्ष व सरचिटणीस विचार विनिमय करुन ठरवतील अशा दिवशी व अशा ठिकाणी दोन महिन्यातून एकदा व्यवस्थापन समितीची बैठक घेतली जाईल.

१६ व्यवस्थापन समितीच्या बैठकीसाठी गणपूर्ती म्हणून कमीत कमी १/३ सदस्यांची उपस्थिती आवश्यक राहिल.

१७ तहकूब केलेल्या बैठकीसाठी गणपूर्तीची आवश्यकता नाही.

१८ व्यवस्थापन समितीच्या बैठकीबाबत कमीत कमी तीन दिवस आधी सूचना दिली जाईल.

१९ व्यवस्थापन समितीच्या सततच्या तीन बैठकांना गैरहजर रहाणा-या कार्यकारणी सदस्याचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल. मात्र त्याचे संघटनेतील सभासदत्व सुरु राहील.

**-: पदाधिकारी यांची कर्तव्ये:-**

२० अध्यक्ष:-अध्यक्ष हे व्यवस्थापन समितीच्या सर्व बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारतील, सुव्यवस्था राखतील सर्व कार्यवृ-तांतावर सहया करतीलआणि ते केवळ निर्णायक मत देवू शकतील. आवश्यक असेल तेव्हा

उप निबंधक, श्रमिक संघ
महाराष्ट्र शासन, मुंबई

Scanned with CamScanner

व्यवस्थापन समितीच्या किंवा संघाच्या विशेष बैठकी बोलविण्याचाअधिकारअध्यक्षांनाअसेल.संघटनेच्या निधीचा विनियोग कशा प्रकारे व कोणकोणत्या कामासाठी करण्यात यावा याबाबत सरचिटणीसांशी सल्ला मसलत करतील. धनादेशावर सही करण्याचा त्यांना अधिकार असेल. सरचिटणीसांशी विचार विनिमय करुन संघटनेच्या निधीचे वितरण करण्याबाबत निर्णय घेतील. संघटनेच्या सभासदांच्या समस्यां बाबत निर्माते, दिग्दर्शक, वितरक यांचेशी करण्यात येणा-या चर्चेच्या वेळी उपस्थित राहून संघटनेच्या वतीने सभासदांचे/कलाकारांचे, तंत्रज्ञांचे प्रश्न/समस्या मांडण्याचा तसेच त्यांचे मागण्यांबाबत करण्यात येणा-या कराराचे वेळी उपस्थित राहून संघटनेच्या वतीने करारावर सही करण्याचा त्यांनाअधिकारअसेल. संघटना वाढीसाठी ते प्रयत्न करतील व संघटनेच्या कामकाजावर देखरेख/ नियंत्रण ठेवतील.

**सरचिटणीस:**-संघाच्या व समितीच्या सर्व बैठकीचे कार्यवृत्तांत लिहून घेतील व सर्व पत्रव्यवहार सांभाळतील. अध्यक्षांशी विचार विनिमय करुन सर्व बैठकी बोलावतील. सर्व हिशोब ठेवतील, संघाच्या कामकाजावर देखरेख ठेवतील. पावत्या आणि खर्चाचे अचूक हिशोब ठेवतील. ते दरवर्षी जमेची व खर्चाची प्रत्येक बाब स्पष्टपणे दर्शविणारा ताळेबंद तयार करतील. श्रमिक संघ अधिनियम, १९२६ अन्वये श्रमिक संघ निबंधकास कळवावयाची सर्व विवरणे व सूचना संबंधीत अधिका-याकडे सादर करण्याबाबत सरचिटणीस जबाबदार राहतील. अध्यक्षांशी विचार विनिमय करुन आणि व्यवस्थापन समितीच्या मान्यतेस अधिन राहून त्यांना आवश्यक वाटतील इतके सहाय्यक संघटनेच्या लेखन विषयक व इतर कामकाजासाठी घेण्याचा त्यांना अधिकार असेल. सर्व सहाय्यक त्यांच्या नियंत्रणाखाली असतील. संघटनेच्या निधीचा विनियोग कशा प्रकारे व कोणकोणत्या कामासाठी करण्यात यावा याबाबत अध्यक्षांशी सल्ला मसलत करतील. अध्यक्षांच्या परवानगीने संघटनेच्या निधीचा विनियोग करतील. तसेच धनादेशावर सही करण्याचा त्यांना अधिकार राहील. संपुर्ण भारतातील व महाराष्ट्रातील संघटनेच्या सभासदांच्या समस्यांबाबत निर्माते, दिग्दर्शक, वितरक यांचेशी करण्यात येणा-या चर्चेच्या वेळी उपस्थित राहून संघटनेच्या वतीने सभासदांचे प्रश्न/समस्या मांडण्याचा तसेच त्यांचे मागण्यांबाबत करण्यात येणा-या कराराचे वेळी उपस्थित राहून संघटनेच्या वतीने करारावर सही करण्याचा त्यांना अधिकार असेल. संघटना वाढीसाठी ते प्रयत्न करतील व संघटनेच्या कामकाजावर देखरेख/नियंत्रण ठेवतील.

२२ **खजिनदार:**- संघाच्या वेळोवेळी जमा करण्यात येणा-या सर्व रकमाआणि त्यांचा बँकेत होणारा यथायोग्य भरणा याबद्दल खजिनदार जबाबदार राहतील. समितीने मंजूर केलेल्या सर्व खर्चासाठी ते रकमा देतील. धनादेशावर सही करण्याचा त्यांना अधिकार नसेल. धनादेशावरील अध्यक्ष व सरचिटणीस यांचे संयुक्तीक सहीने त्यांना बँकेतून पैसे/रकमा काढता येतील. सभासदांची वर्गणी मुख्य कार्यालयाच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत ते निर्देश देतील. तसेच देणगीदारास देणगी मुख्य कार्यालयाच्या बँक खात्यात

उप निबंधक, श्रमिक संघ, महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner

जमा करण्यास सांगतील व त्याबाबतचा हिशोब ठेवतील. अन्य राज्यातील राज्य तसेच जिल्हा कमिटयांच्या आर्थिक कामकाजावर देखरेख/नियंत्रण ठेवतील. तसेच संघटनेच्या जमा खर्चावर नियंत्रण ठेवतील. सरचिटणीसांचे मदतीने संघटनेच्या निधीचे अन्य राज्यातील राज्य तसेच जिल्हा कमिटयांना वाटप करतील.

राज्य कमिटी/जिल्हा कमिटी:- संपुर्ण भारतातील विविध राज्यातील राज्य कमिटी त्या त्या राज्यातील व जिल्हा कमिटी त्या त्या जिल्हयातील, संघटनेच्या सभासदांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करेल. त्यांचे कडून प्रश्न सोडविले जात नसल्यास मुख्य कमिटीशी सल्ला मसलत करुन व त्यांचे मार्गदर्शन घेऊन प्रश्न हाताळतील. मुख्य कमिटी, राज्य कमिटी, जिल्हा कमिटीला योग्य ते मार्गदर्शन करेल. मात्र काम बंद आंदोलन, संप किंवा कामगारांच्या मागण्यांबाबत निर्माते, व्यवस्थापन/मालकांकडे सादर करावयाचे करार मुख्य कमिटीशी सल्ला मसलत करुनच सादर करतील. तसेच निर्मात्यांशी, व्यवस्थापनाशी/मालकांशी करावयाचा करार मुख्य कमिटीचे अध्यक्ष व सरचिटणीस यांचे समक्ष करण्यात येईल. मुख्य कमिटीच्या परवानगी शिवाय परस्पर करार करण्याचा अधिकार राज्य कमिटी अथवा जिल्हा कमिटीला राहणार नाही. तेथील सभासदांकडून त्यांची वर्गणी व देणगीदाराकडून प्राप्त होणारी देणगी मुख्य कार्यालयाच्या बँक खात्यामध्ये परस्पर जमा करण्याबाबत कार्यवाही करतील. व त्याचा सर्व हिशोब उप खजिनदार हे मुख्य कार्यालयाला सादर करतील. राज्य कमिटी व जिल्हा मधील सदस्यांची कामे ही मुख्य कार्यकारीणीतील पदधारकांप्रमाणेच राहतील. राज्य कमिटी अथवा जिल्हा कमिटी मधील पदाधिकारी यांनी गैरव्यवहार, अफरातफर केल्यास ती कमिटी अथवा संबंधीत पदाधिकारी त्यास जबाबदार राहतील. मुख्य कार्यकारणीचा त्याचेशी काहीही संबंध असणार नाही. अशा प्रकारचे गैरवर्तन ज्या कमिटीकडून अथवा कमिटीच्या सदस्यांकडून घडेल त्या कमिट्या बरखास्त करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारणीस रहातील.

**-:सर्वसाधारण सभा:-**

२४ खाली दिलेले कामकाज चालविण्यासाठी संघाच्या सर्व सदस्यांची सर्वसाधारण वार्षिक सभा वर्षाच्या जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात घेण्यात येईल.

अ संघाने केलेल्या कार्याचा अहवाल आणि हिशोबाची विवरणपत्रे स्वीकृत करणे.

ब संघाच्या लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकांची नियुक्ती करणे.

क दर तीन वर्षानी व्यवस्थापन समितीवरील पदधारी आणि सदस्यांची निवड करणे.

ड कार्यकारणीवरील पदाधिका-याने राजीनामा दिलाअसल्यासअथवा कार्यकारणीच्या सभेस सतत तीनवेळा पदाधिकारी गैरहजर राहीला म्हणून कार्यकारणीने त्याचे सभासदत्व रद्द केले असेल तर त्यास मंजुरी देणे.

इ कार्यकारीणीत रिक्त झालेल्या पदावर व्यवस्थापन समितीने स्वीकृत केलेल्या सदस्याच्या नियुक्तीस

Scanned with CamScanner

मान्यता देणे अथवा पुढील निवडणूकीपर्यंतच्या कालावधीकरीता अन्य सभासदाची नियुक्ती करणे.

छ अध्यक्षांच्या परवानगीने सभेमध्ये मांडण्यात येईल असे इतर कामकाज चालविणे.

२५ अध्यक्ष किंवा सरचिटणीस हे त्यांना आवश्यक वाटेल त्यावेळी संघाच्या सदस्यांची सर्वसाधारण सभा बोलावू शकतील तसेच संघाच्या एकूण सदस्य संख्येपैकी १/५ सदस्यांनी आपल्या सहीनिशी मागणी केल्यावर अशी मागणी मिळाल्यापासून २० दिवसांच्या आंत सभा बोलावतील, जर अध्यक्ष किंवा सरचिटणीस यांनी अशी सभा बोलविण्यात कसूर केल्यास रितसर सूचनेनंतर मागणी करणा-यांना स्वत:च तशी सभा बोलविण्याचा अधिकार राहील आणि त्या सभेचे कामकाज संघटनेस बंधनकारक राहील.

२६ सर्वसाधारण सभेकरिता सदस्यांना कमीत कमी १५ दिवस आधी सूचना देण्यात येईल.

२७ सर्वसाधारण सभेच्या गणपूर्तीकरिता कमीत कमी १/३ सदस्यांची उपस्थिती आवश्यक आहे.

२८ तहकूब केलेल्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता नाही.

**-: सर्वसाधारण निधी :-**

२९ संघाच्या सर्वसाधारण निधीमध्ये सदस्यांकडून मिळणारी वर्गणी व देणगीचाच समावेश असेल. हा निधी व्यवस्थापन समितीने मान्य केलेल्या बँकेत संघाच्या नावाने ठेवण्यात येईल आणि त्या खात्याचे कामकाज सांभाळण्यासाठी खजिनदार हे प्रमुख असुन, बँक धनादेशावरील अध्यक्ष व सरचिटणीस या दोन पदाधिका-यांच्या संयुक्तिक सहीने बँकेचे कामकाज हाताळले जाईल. सरचिटणीस किंवा खजिनदार यांना चालू खर्चा करीता रुपये २,०००/- पेक्षा जास्त रोख रक्कम स्वत: जवळ ठेवता येणार नाही.

**-: सर्वसाधारण निधीतून ज्यावर खर्च करावयाची अशी उद्दिष्टे :-**

३० श्रमिक संघ अधिनियम, १९२६ च्या कलम १५ मधील उपबंधांच्या अधिन राहून संघाच्या सर्वसाधारण निधीतील रक्कम खालील उदिदष्टांशिवाय अन्य कोणत्याही उदिदष्टासाठी खर्च करण्यात येऊ नये.

क संघाच्या अधिका-यांचे वेतन व भत्ते.

ख संघाच्या सर्वसाधारण निधीच्या लेखा परीक्षेचा खर्च भरुन संघाच्या प्रशासनाचा खर्च चुकता करणे.

ग संघाने लेखन विषयक कामकाजासाठी नेमलेल्या कर्मचा-यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च.

घ संघाने म्हणूनअसे कोणतेही किंवा एखाद्या सदस्याचीआपल्या मालकाशी किंवा त्यासदस्यांनी कामावर देवू केलेल्या एखाद्या व्यक्तीशी असलेल्या संबंधातून उद्भवणारे अधिकार यांची प्राप्ती किंवा संरक्षण करण्या करिता खटला दाखल करण्यातआलाअसेल किंवा बचाव देण्यातआला असेल,अशा वेळी त्यामध्ये संघ किंवा संघाचा सदस्य पक्षकारअसेलअशा कोणत्याही वैध कार्यवाहीत खटला चालविणे किंवा बचाव देणे.

ङ संघाच्या किंवा संघाच्या एखादया सदस्याच्या वतीने श्रमिक तंटे चालविणे.

च श्रमिक तंटयामुळे झालेल्या हानीबददल सदस्यांना नुकसान भरपाई देणे.

उप निबंधक, श्रमिक संघ
श्रमिक संघ अधिनियम १९२६
महाराष्ट्र शासन, मुंबई

Scanned with CamScanner

छ सदस्यांना किंवा त्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना अशा सदस्यांचा मृत्यु, वार्धक्य, रुग्णता, अपघात किंवा बेकारी याबाबत भत्ते देणे.

ज आयुर्विमा उतरवणा-या सदस्यांना किंवा रुग्णता, अपघात किंवा बेकारी याबाबत विमा उतरविणा-या सदस्यांना विमापत्र देणे किंवा त्याबाबत त्यांना शैक्षणिक,सामाजिकआर्थिक लाभ देण्यासाठी तरतूद करणे (त्यात मृत सदस्यांसाठी करावयाच्या सर्वसाधारण किंवा धर्मिक खर्चाचा समावेश आहे.)

झ संघटनेच्या वतिने सर्व कलाकार,तंत्रज्ञ, कामगार/कर्मचारी यांना ठराविक रकमेची आयुर्विमा पॉलिसी व वैद्यकीय विमा पॉलीसी काढून देणे.

त्र नैसर्गिक आपत्ती, साथीचे रोग, किंवा एखाद्या सदस्याचे कामबंद झाल्यास शक्य असेल त्यानुसार त्यास आवश्यक ती मदत करणे.

य साथीचे रोग व अन्य कारणांमुळे कलाकारांचे, कामगार वर्गाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच कलाकारांचे व अन्य कामगारांचे झालेले नुकसान भरपाईसाठी दानशुर व्यक्तिंकडून देणगीव्दारे मदत मिळवून एक स्वतंत्र फंड निर्माण करणे तसेच संघटनेकडे उपलब्ध असलेल्या निधीपैकी काही रक्कम सदरहू फंडामध्ये वर्ग करुन शक्य होईल ती मदत संघटनेच्या सदस्यांना देण्याचा प्रयत्न करणे.

र संघटनेमार्फत राष्ट्रीय नेत्यांच्या जयंत्या, महत्वाचे सण, उत्सव, १५ ऑगष्ट, २६ जानेवारी, १ मे कामगार दिन इत्यादी साजरे करणेसाठी, संघटनेच्या सदस्यांचे ज्ञानात वृध्दी होणेसाठी तसेच त्यांचे आरोग्य चांगले रहाणेसाठी व त्यांची कार्यक्षमता वाढीसाठी विविध नेत्यांची व्याख्याने, परिषदा, चर्चासत्रे, आरोग्य विषयक शिबिरे आयोजित करणे व सदस्यांना योग्य ते प्रशिक्षण देणेसाठी होणारा खर्च भागविणे.

ल संघाचा सर्वसाधारण निधी ज्यावर खर्च करता येईलअशा कोणत्याही प्रकारच्याउदिदष्टां करिता रक्कम देणे. परंतु अशा उदिदष्टांचा खर्च त्या वर्षामध्ये संघाच्या सर्वसाधारण निधीसाठी त्यावेळेपर्यंत संचित झालेले स्थूल उत्पन्न आणि त्या वर्षाच्या प्रारंभी निधीत जमा असलेली शिल्लक रक्कम या दोन्हींच्या बेरजेच्या ¼ पेक्षा अधिक असता कामा नये.

व अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही गोष्टीस अधीन राहून समुचित शासनाव्दारे राजपत्रात प्रसिध्द करण्यात येईल, असे कोणतेही उदिदष्ट.

**-: वार्षिक लेखा परिक्षण :-**

३१ मुंबई श्रमिक संघ विनियम१९२७च्या नियम १८ नुसार व्यवस्थापन समितीने नियुक्त केलेल्या सक्षम लेखा परिक्षकांकडून संघाच्या हिशोबाचे लेखा परिक्षण करण्याबाबत संघ योग्य ती तरतूद करेल.

**-: लेखा पुस्तकांची तपासणी :-**

३२ संघाची लेखा पुस्तके सुटटीचे दिवस सोडून इतर कोणत्याही दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये सभासदांस किंवा पदाधिका-यांना तपासणीसाठी खुली ठेवण्यात येतील.

उप निबंधक, श्रमिक संघ, महाराष्ट्र श्रमिक संघ अधिनियम १९२६, महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned with CamScanner

## -: नियमातील दुरुस्ती :-

३३ सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांच्या ¾ बहुमताने कोणत्याही वेळी नियमात दुरुस्ती, फेरफार, पुनःस्थापन, विखंडन करता येईल किंवा वाढवता येईल. परंतु अशा प्रस्तावित फेरबदला संबंधी सदस्यांना कमीत कमी पंधरा दिवस आधी सूचना दिली पाहिजे.

## -: संघाचे विघटन :-

३४ संघाचे विघटन करण्याचे प्रयोजनासाठी बोलाविलेल्या सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या सदस्यां पैकी ¾ सदस्यांचे बहुमत असल्याशिवाय संघाचे विघटन केले जाणार नाही. मात्र अशा सभेत मतांची एकूण संख्या पटावरील एकूण संख्येच्या २/३ पेक्षा कमी नसावी. सर्व दायित्वे भागविल्यानंतर संघाच्या उरलेल्या निधीचा विनियोग सर्व सभासदांना समान पध्दतीने करण्यात येईल.

प्रमाणित प्रत

सरचिटणीस

उपनिबंधक
श्रमिक संघ अधिनियम
१९२६, कोकण विभाग,
मुंबई

पृष्ठ क्र.

Scanned with CamScanner